पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर
शहर वाहतुक विभाग, उप विभाग **वागळे**

जा.क्र./शवावि/वा.ई. वा.उ.वि./४५/२०२२ दि. ०१/०७/२०२२

—:वाहतुक नियत्रंण अधिसुचना:—

**ज्याअर्थी** वागळे इंस्टेट वाहतुक उपविभागाचे कार्यक्षेत्रातील काजुवाडी येथे मा.मुख्यमंत्री साहेब महाराष्ट्र राज्य हे राहण्यास असुन, सदर सर्व्हिस रोडवर नतीन कंपनीकडुन ,काजुवाडी,पप्पुचा ढाबा,ग्रिन रोड, येथे जाणा—या व येणा—या वाहनाची संख्या अधिक प्रमाणात असल्याने मा. मुख्यमंत्री साहेब यांच्या निवासस्थाना जवळ वाहतुक कोंडी होत असते. त्याकरीता सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असल्याने व ठाणे शहर परीसरात वाहतुक कोंडी होवूनये,वाहतुक सुरळीत व सुनिश्चित होणे करीता आम जनतेच्या सोयीसाठी.

**त्याअर्थी** , मी दत्तात्रय कांबळे पोलीस उप आयुक्त वाहतुक शाखा ठाणे शहर म्हणुन मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र.एम.व्ही. ए.—११६/सीआर/३७/टीआर/दि.२७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील अधिसुचना जारी करीत आहे:—

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद** | नितीन कंपनी जवळील सर्व्हीस रोडवरून,काजुवाडी,पप्पुचा ढाबा ,ग्रीनरोड व तीनहात नाक्याकडे जाणा—या सर्व प्रकारच्या वाहतुकीस '' प्रवेश बंद '' |
| **पर्यायी मार्ग** | सदरची वाहने ही नितीन कंपनीकडून ज्ञानेश्वरनगर कडे जाणा—या रोडने जावून—पुढे डावीकडे वळून रामचंद्र नगर गेट नं.१ — घडयाळ चौक—येथून पुढे इच्छित स्थळी जातील. |

सदरची वाहतुक अधिसुचना ही दि. ०१/०७/२०२२ रोजी पासुन लागु करण्यात येत आहे.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने,फायर ब्रिगेड,रूग्णवाहीका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु होणार नाही.

( दत्तात्रेय कांबळे)
पोलीस उप आयुक्त
वाहतुक विभाग,ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी , ठाणे

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्दी करण्यात विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी ,ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालीका, ठाणे

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१,ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे

प्रतकार्यवाहीसाठी